महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि. २८/ १० /२०२५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-8A (E-११६८०५०), दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# विहिर पुनर्भरण

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

भूजलाचा उपसा करण्याचे प्रमाण पुनर्भरणा पेक्षा जास्त आहे, त्याप्रमाणात भूजलाचे पुनर्भरण होत नाही, त्यामुळे भूजल पातळी दिवसेंदिवस खोल गेलेली आहे. भूजल पातळी वाढवण्यासाठी पावसाचे पाणी जिथे जिथे शक्य आहे, त्या ठिकाणी जिरविण्याचे प्रयत्न करणे आवश्यक तर आहेच, सोबतच उपलब्ध असलेल्या भूजलाचा काटकसरीने व शास्त्रीय पद्धतीने वापर करणे गरजेचे आहे. शेतक-यांकडे पिकास संरक्षित सिंचन देणेकरिता अस्तित्वातील विहिरीद्वारे पाण्याची उपलब्धता होणेचे अनुषंगाने जागतिक बँक अर्थसहाय्यीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत भूजल पुनर्भरणाकरिता विहीर पुनर्भरण हा वैयक्तिक लाभाचा घटक राबविण्यात येत आहे.

**उद्दिष्टे:**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेल्या गावसमुहातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. कृषि क्षेत्रात सिंचनासाठी अस्तित्वात असलेल्या विहिरीचे पुनर्भरण करून भूजलाच्या स्थितीत वाढ करणे.
३. दुष्काळग्रस्त भागामध्ये जास्तीचा पाणी साठा जतन करणे व लोकांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणे.

**लाभार्थी निवडीचे निकष:**

१. प्रकल्पांतर्गत विहीर पुनर्भरण या घटकासाठी ५ हेक्टर पर्यंत जमीन धारणा असलेल्या शेतकऱ्यांमधून अनुक्रमे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग व सर्वसाधारण या प्राधान्यक्रमानुसार लाभार्थी निवड करण्यात येईल.
२. सदर घटकाचा इतर कोणत्याही योजनेतून पूर्वी लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा लाभ देय नाही.

**अर्थसहाय्य:**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विहीर पुनर्भरण घटकासाठी अनुज्ञेय अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे;

| अ.क्र. | विहीरींचे पुनर्भरण (प्रकार) | अनुज्ञेय अनुदान (रु.)<br>येणा-या खर्चाच्या १००% किंवा खालील मापदंडप्रमाणे |
|---|---|---|
| १. | भारी जमीन पक्की विहीर | १९४९२ |
| २. | हलकी जमीन पक्की विहीर | २०२२५ |
| ३. | भारी जमीन कच्ची विहीर | २१३८५ |
| ४. | हलकी जमीन कच्ची विहीर | २२११८ |

संदर्भ: मृद वजलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. मापदं - २०१९ /प्र.क्र. ३०/जल-७, दिनांक २६ मे २०२३ अन्वये पाणलोट क्षेत्र आधारित जलसंधारण कामासाठी निश्चित केलेले मजुरीच्या दरानुसार निर्धारीत आर्थिक मापदंड.

**तांत्रिक निकष**

मृद वजलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. मापदं - २०१९ /प्र.क्र. ३०/जल-७, दिनांक २६ मे २०२३ अन्वये पाणलोट क्षेत्र आधारित जलसंधारण कामासाठी निर्धारीत तांत्रिक मापदंड.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | साठवण खड्डा | ३ मी. X ३ मी. X २ मी. |
| २. | शोष खड्डा | २ मी. X२ मी. X २ मी. |
| ३. | साठवण खड्ड्याकरिता इनलेट | लांबी २० मी., माथा १.२० मी., पाया ०.६० मी., खोली ०.६० मी. |
| ४. | साठवण खड्डा ते शोष खड्डा नाली | लांबी २ मी., माथा ०.९० मी., पाया ०.६० मी., खोली ०.३० मी. |
| ५. | शोष खड्ड्याकरिता आउटलेट | लांबी १५ मी., माथा०.९० मी., पाया ०.६० मी., खोली ०.३० मी. |

मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केल्यानूसार निश्चित केलेल्या तांत्रिक निकषांनुसार साहित्य असणे आवश्यक आहे.

**तांत्रिक मार्गदर्शक सुचना**

**अ) विहिरीचे पुनर्भरण -**

१. विहीरींची निवड करीत असताना त्याची खोली पुरेशी असावी, जेणे करून त्या भागात अस्तित्वात असलेला जलधारक खडक पूर्णपणे भेदलेला असावा, त्यामुळे विहीर पुनर्भरण करून कृत्रिमरित्या भूजल उपलब्धतेत वाढ करता येणे शक्य होईल.

२. ज्या विहीरींमधील ऑक्टोबर महिन्यातील पाण्याची पातळी सरासरी ४ मीटर पेक्षा खाली असेल अशा ठिकाणी ही प्राधान्याने हा घटक राबविण्यात यावा, जेणे करून पावसाळ्यात विहीरींमध्ये पाणी मुरविता येणे शक्य होईल.

३. गावातील जास्तीतजास्त विहीरी शक्यतो एकत्रितपणे या योजनेसाठी निवडण्यात याव्यात, जेणे करून त्याचा फायदा गावाला लगेच मिळणे शक्य होईल.

४. विहीरींची निवड करीत असतांना पाणथळ क्षेत्र, अतिपाणी वापरामुळे जमीन खारवट झालेले क्षेत्र, प्रदूषणाची समस्या असलेले क्षेत्र आदी टाळण्यात यावेत.

**५.** संकल्प चित्रा मध्ये दर्शविल्या प्रमाणे गाळण थरांचाच (Filter) उपयोग करून कृत्रिम पुनर्भरण करण्यात यावे. **गाळणथराशिवाय हा घटक राबविण्यात येऊ नये.**

६. फिल्टरच्या माध्यमातून फिल्टर होऊन विहीरींत जाणारे पाणी गाळविरहित असावे. त्याचबरोबर त्यात प्रदूषित घटकांचा अंतर्भाव असू नये.जसे उकीर्ड्यावरील अथवा इतर सांडपाणी फिल्टर मध्ये येणार नाही याची काळजी घ्यावी. यासाठी आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात याव्यात .

७. फिल्टर हे विहीरींच्या वरच्या (Upstream) बाजूसच करण्यात यावा.

८. फिल्टरचे बांधकाम करीत असतांना ते मजबूत व टिकाऊ असेल याची दक्षता घ्यावी तसेच त्याच्या खोदकामाचे वेळी अथवा विहीरीला जोडत असतांना विहीरींला धोका होणार नाही याची काळजी घ्यावी, त्यासाठी विहीर व फिल्टर मध्ये योग्य अंतर ठेवावे.

९. शेतातील जास्तीत जास्त पाणी विहीर पुनर्भरणासाठी उपलब्ध व्हावे याकरिता आवश्यकतेनुसार चरांसारखी व्यवस्था करण्यात यावी.

१०. पावसाचे पाणी, जमिनीवरील अथवा ओढ्याचे पाणी खूप जास्त प्रमाणावर येण्याची शक्यता असल्यास जादाचे पाणी फिल्टर पासून दूर काढून देण्याची व्यवस्था करण्यात यावी. जेणेकरून फिल्टरला होणारा पुराचा धोका टाळता येईल.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना:**

१. खूप वेगाने पाऊस पडत असल्यास जास्तीचे पाणी गाळणखड्ड्याच्या पासून दूरवर नाल्यात/शेताबाहेर सोडण्याची व्यवस्था करण्यात यावी.
२. गाळणखड्ड्याच्या क्षमतेइतके पाणी गाळणखड्ड्यात सोडण्याची व्यवस्था करण्यात यावी, त्यासाठी शेतात येणाऱ्या पाण्यापैकी काही हिस्साच गाळणखड्ड्याकडे आणण्याची व्यवस्था असावी.
३. काडी - कचरा अथवा इतर गाळ गाळणखड्ड्यात येऊ नये यासाठी योग्य ती व्यवस्था करण्यात यावी.
४. ज्या भागात मातीचे प्रमाण जास्त असेल त्याठिकाणी गाळणखड्ड्यांमध्ये माती पडू नये यासाठी आवश्यक तो आधार देण्यात यावा.
५. गाळणखड्ड्यांत मोठ्या प्रमाणावर गाळ जमा झाला असल्यास पाऊस नसतांनाच्या काळात वरचा रेतीचा थर काढून तो पाण्याने धूवून घ्यावा. अथवा गाळण खड्ड्यात जमा झालेला गाळ काढून टाकण्यात यावा. अशाप्रकारे गाळ गाळणखड्ड्यात साचणार नाही याची काळजी घेतल्यास गाळणखड्ड्यातून पाणी पूर्ण क्षमतेने गाळल्या जाऊन स्वच्छ पाणी विहीरीत पडण्यास मदत होईल.
६. शेतकऱ्याने पडणाऱ्या पावसाचा वेग व गाळणखड्ड्यात येणारे पाणी यावर सतत लक्ष ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा गाळणखड्डा भरून गढूळ पाणी विहीरीत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.
७. गाळणखड्डा व विहीरी यात सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक आहे. गाळणखड्डा विहीरीला जोडण्यासाठी करण्यात यावयाचा ट्रेंच पीव्हीसी पाईप घातल्यावर दगड टाकून व्यवस्थितपणे बुजविण्यात यावा. त्याचप्रमाणे ज्याठिकाणी पाईप विहीरीत सोडण्यात आलेला आहे ती जागा देखील व्यवस्थित बंद करण्यात यावी.
८. पूर परिस्थिती उद्भवण्याचा धोका दिसत असल्यास गाळणखड्ड्याकडे येणारे सर्व पाणी पूर्णपणे बंद करण्यात यावे व ते शेताबाहेर अथवा नाल्यामध्ये जाईल अशाप्रकारे व्यवस्था करण्यात यावी.

**अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या-**
**लाभार्थी**

१. इच्छुक शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in संकेतस्थळावर नोंदणी करावी व आवश्यक कागदपत्रासहित ऑनलाईन अर्ज सादर करावा.
२. आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील. तसेच कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही.
३. मार्गदर्शक सूचनेमध्ये दिलेल्या तांत्रिक निकषाप्रमाणे साहित्य खरेदी करणे बंधनकारक राहील.
४. काम पूर्ण झाल्यानंतर अनुदान मागणी प्रपत्र अपलोड करून अनुदान मागणी करावी.
५. तालुका कृषि अधिकारी यांनी ऑनलाईन पूर्वसंमती दिल्यानंतर घटकाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी.

**ग्राम कृषि विकास समिती (GKVS)**

१. गावातील इच्छुक शेतकऱ्यांना या घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठीचे अर्ज करणे, यासाठी जनजागृती करतील.
२. ऑनलाईन प्राप्त सर्व अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग शेतकरी व सर्वसाधारण या प्राधान्यक्रमानुसार लाभार्थी निवड करतील.
३. इच्छुक लाभार्थी यांचे प्राप्त अर्जांच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणांसह अवगत करतील.
४. अंमलबजावणी करण्यात आलेल्या बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.

**समूह सहाय्यक**

१. समुह सहायक हे इच्छिूक लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in द्वारे अर्ज करून घेतील.
२. शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केल्यानंतर शेतकऱ्याने अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी करतील.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झालेनंतर तसा ठराव सकेतस्थळावर अपलोड करणे.
४. शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगावे.
५. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**सहाय्यक कृषि अधिकारी**

१. अर्जदाराने ऑनलाईन अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी करणे.
२. छाननी करताना शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज, ग्राम कृषि विकास समिती सभेचे इतिवृत्त, इत्यादी बाबींची छाननी करणे.
३. लाभार्थी शेतक-र्याने अर्जामध्ये यापूर्वी इतर योजनेतून लाभ घेतलेला आहे काय? याची पडताळणी करून पूर्वसंमतीस शिफारस करणे.
४. पात्र अर्जदाराच्या प्रस्तावित प्रकल्प स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करून अस्तित्वातील विहीर पुनर्भरणा करिता तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय यांची पडताळणी करावी आणि आवश्यक माहिती डीबीटी ॲपमध्ये भरणे.
५. प्रत्यक्ष स्थळ पाहणी नुसार अंदाजपत्रक तयार करून डेस्क २ वरुन अपलोड करणे.
६. लाभार्थ्यास पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष स्थळावर आखणी करून देणे व मार्गदर्शन करणे.
७. काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे.
८. लाभार्थी शेतकऱ्यांने काम पूर्ण झाल्याचे ऑनलाईन कळविल्यानंतर मोका तपासणी करणे व झालेल्या कामाच्या मापनपुस्तिकेत नोंदी घेणे, देयके व इतर आवश्यक कागदपत्रे डीबीटी ॲपमध्ये अपलोड करणे.

**उप कृषि अधिकारी**

१. सदर घटकाबाबत गावामध्ये व्यापक प्रचार प्रसिद्धी करणे, घटकांचे तांत्रिक निकषाबाबत गावामध्ये व ग्राम कृषि विकास समिती मध्ये जन जागृती करणे.
२. काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे
३. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

**मंडळ कृषि अधिकारी**

१. काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे.
२. कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.
३. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

**तालुका कृषि अधिकारी**

१. सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडुन पूर्वसंमती करिता शिफारस झालेल्या प्रस्तावांतील कागदपत्रांची व अर्जाची छाननी करावी.
२. स्थळनिश्चिती अहवाल व त्यानुसार सहाय्यक कृषि अधिकारी यांनी तयार केलेल्या सविस्तर अंदाजपत्रकांची तपासणी करण्यात यावी.

३. सदरचा लाभार्थी पूर्वसंमतीस पात्र असल्याबाबत तालुका कृषि अधिकाऱ्यांची खात्री पटल्यानंतर ऑनलाईन पूर्वसंमती देण्यात यावी.
४. लाभार्थीस प्रदान करण्यात आलेली पूर्वसंमती म्हणजेच तांत्रिक मान्यता असेल .
५. ज्या शेतक-याचे अर्ज / कागदपत्रांची पुर्तता झाली नसेल, यास्तव पुर्ततेअभावी पुर्वसंमती देता येणार नसेल असे प्रस्ताव त्रुटी नमूद करून सहायक कृषि अधिकारी यांना पुन्हा त्रुटी पूर्ततेसाठी परत (sent back) पाठवतील.
६. मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थी पात्र ठरत नसल्यास तालुका कृषि अधिकारी अर्ज रद्द (Reject) करतील.
७. कामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे.
८. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

### लेखाधिकारी उपविभाग स्तर :

१. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावाची लेखा अधिकारी उपविभाग स्तर हे मुख्यतः खालील बाबींची छाननी करतील. शेतक-याने अपलोड केलेला काम पूर्णत्वाचा दाखला तसेच सहाय्यक कृषि अधिकारी स्तरावरून अपलोड केलेला मोका तपासणी अहवाल (परिशिष्ट ४), मापन पुस्तिका, प्रकल्प स्थळाचे शेतकऱ्यासमवेत फोटो व इतर कागदपत्रे.
२. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी शिफारस केलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार आहे काय याची खातरजमा करतील.
३. अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.
४. प्रस्तावाच्या छाननी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास शेरा नमूद करून संबंधीत सहाय्यक कृषि अधिकारी यांचे कडे त्रुटी पूर्ततेसाठी परत (Back To Stage ) पाठवतील.

### उपविभागीय कृषि अधिकारी

१. लेखाधिकारी स्तरावरुन शिफारस झालेले प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावाची छाननी उपविभागीय कृषि अधिकारी स्तरावर करण्यात येईल व लेखाधिकारी यांनी शिफारशीत केलेल्या अनुदानाच्या रकमेस अंतिम मान्यता देतील.
२. प्रस्तावाच्या छाननी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास शेरा नमूद करून मागील डेस्क वर सदर प्रकरण त्रुटी पूर्ततेसाठी परत (Back To Stage ) पाठवतील.
३. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

### जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी:-

१. जिल्ह्यामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. पूर्ण कामांची आकस्मिक तपासणी करावी व विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल सादर करावा.

### विभागीय कृषि सहसंचालक:


१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

**क्षेत्रीय तपासणी**

सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सनियंत्रण अधिकाऱ्यांनी सोबतच्या विहीत परिशिष्ट-६ मधिल नमुन्यात तपासणी करावी व तपासणी अहवाल सादर करावा.

| सनियंत्रण अधिकारी | तपासणी टक्केवारी |
|---|---|
| विभागीय कृषि सहसंचालक | ०.५ % |
| नोडल अधिकारी, वि.कृ.स.सं. कार्यालय | ०.५% |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १% |
| नोडल अधिकारी, जि.अ.कृ.अ. कार्यालय | १ % |
| उपविभागीय कृषि अधिकारी | ३ % |
| तालुका कृषि अधिकारी | १०% |
| मंडळ कृषि अधिकारी | १५ % |
| उप कृषि अधिकारी | २५ % |

# संकल्प चित्र – विहिरचे पुनर्भरण




विहिर पुनर्भरण

# परिशिष्ट - १

## अर्ज छाननी विविध स्तर

| अनु क्र. | कार्यवाही प्रक्रिया | स्तर | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | लाभार्थी शेतकाऱ्याने अर्ज करणे व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे | लाभार्थी | - |
| १. | लाभार्थी शेतकाऱ्याने अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती यांची पडताळणी करणे | समूह सहायक | १० दिवस |
| २. | ग्राम कृषि विकास समितीची मान्यता घेणे | समूह सहायक ग्राम / कृषि विकास समिती | १० दिवस |
| ३. | लाभार्थी शेतकाऱ्याने अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती तसेच ग्राम कृषि विकास समितीची मान्यता यांची पडताळणी करणे | सहायक कृषि अधिकारी | १० दिवस |
| ४. | पूर्वसंमती देणे | तालुका कृषि अधिकारी | १० दिवस |
| ५. | अनुदान मागणी करणे | लाभार्थी शेतकारी | ३० दिवस |
| ६. | मोका तपासणी करणे | सहायक कृषि अधिकारी | १० दिवस |
| ७. | लाभार्थी शेतकाऱ्याने अपलोड केलेली देयके मोका , तपासणी अहवाल व ,इतर अनुषंगिक कागदपत्रे तपासणे व अनुदान शिफारस करणे | लेखाधिकारी<br>उप)विभागीय कृषि अधिकारी कार्यालय( | १० दिवस |
| ८. | अंतिम अनुदान मंजुरी देणे. | उप विभागीय कृषि अधिकारी | १० दिवस |
| ९. | अनुदान वितरण करणे . | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष | - |

# परिशिष्ट - २
# हमीपत्र
# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — विहीर पुनर्भरण

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत **"विहीर पुनर्भरण"** या घटकासाठी मी डीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करीत आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनामधील विहीत अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र मी सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. यापूर्वी मी कोणत्याही शासकीय योजनेमधून प्रस्तावित विहीर पुनर्भरण संरचनेकरिता अनुदान घेतलेले नाही अथवा यापुढे घेता येणार नाही, याची मला जाणीव आहे.
२. विहीर पुनर्भरण या घटकाचे काम करण्यासाठी प्रस्तावित केलेली विहीर माझ्या मालकीची आहे.
३. या घटकाच्या मार्गदर्शक सूचना व तांत्रिक निकषानुसार विहित कालावधीमध्ये काम पूर्ण करणे मला बंधनकारक राहील.
४. सदर काम पूर्ण करण्यासाठी मला कोणतीही आगाऊ रक्कम मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.
५. प्रकल्पाकडून सदरचे काम करण्यासाठी खर्चाच्या विहीत मर्यादेतच अनुदान मिळेल, याची मला जाणीव असून याबाबत कोणतीही तक्रार असणार नाही. देय अनुदानाच्या व्यतिरिक्त येणारा खर्च मी स्वतः करीन.
६. पावसाळ्यात गाळ किंवा दूषित पाणी पुनर्भरण संरचनेत जाणार नाही, यासाठी आवश्यक व्यवस्था मी स्वतः करीन.
७. नैसर्गिक आपत्तीमुळे विहिरीस किंवा पुनर्भरण संरचनेला हानी पोहोचल्यास प्रकल्पाकडून नुकसानभरपाई अनुज्ञेय राहणार नाही याची मला जाणीव आहे.
८. काम पूर्ण झाल्यावर, मी काम पूर्णत्वाचा दाखला ऑनलाइन सादर करीन.
९. प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना सदर घटकाची तपासणी करण्यासाठी माझी संमती राहील तसेच तपासणीसाठी अडथळा निर्माण करणार नाही.
१०. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत सदर घटकाचा लाभ मिळणेसाठी मी सादर केलेली सर्व कागदपत्रे खरी आहेत. वरील सर्व माहीती सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणीत करुन देत आहे. मी चुकीची माहिती सादर करून अनुदान मिळवल्याचे आढळून आल्यास मी अनुदानास अपात्र ठरेल व मिळालेले अनुदान वसूल केले जाईल याची मला जाणीव आहे.
११. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

(टिप : सदरचे परिशिष्ट प्रकल्पाच्या DBT ॲपवर उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे सदरील परिशिष्ट अपलोड करण्यात येवू नये.)

# परिशिष्ट - ३
## स्थळ पाहणी अहवाल
## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प —विहिर पुनर्भरण

श्री/श्रीमती ------------------------------------------- मौजे ---------------- ता.--------------- जि.---------------------यांनी त्यांचे मालकीचे स.नं. / गट नं. ----------- मधील क्षेत्रावर नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत **विहीर पुनर्भरण** या घटकासाठी अर्ज केलेला आहे. मी दिनांक -----------रोजी प्रत्यक्ष भेट देऊन सदर प्रस्तावित प्रकल्प स्थळाची लाभार्थी समक्ष पाहणी केली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | सदर अर्ज ग्राम कृषि विकास समितीने (GKVS) बैठकीमध्ये मंजूर केल्याचा दिनांक | |
| २. | लाभार्थीने मागणी केलेल्या विहिर पुनर्भरणाचा प्रकार | |
| ३. | लाभार्थ्याच्या ८-अ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.) | |
| ४. | विहीर पुनर्भरणासाठी प्रस्तावित स्थळाचा सर्वे नं./गट नं. | |
| ५. | लाभार्थ्याकडे विहीर अस्तित्वात आहे काय? | |
| ६. | लाभार्थीने दाखविलेली विहीर पुनर्भरणासाठी तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय? | आहे/नाही |
| ७. | लाभार्थ्याने यापूर्वी याच घटकाचा लाभ इतर शासकीय योजनेतून घेतलेला आहे काय ? | आहे/नाही |
| ८. | स्थळ तपासणीबाबतचे अभिप्राय | |

प्रस्तावित प्रकल्प स्थळाची मी लाभार्थी समक्ष पाहणी केली असता सदर घटक राबविण्यासाठी जागा तांत्रिक निकषानुसार योग्य आहे. प्रकल्प राबविण्यासाठी लाभार्थी सक्षम व पात्र आहे. वरील सर्व बाबी विचारात घेऊन सदर लाभार्थ्यास पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे.

**स्वाक्षरी**

नाव : ______________________

**सहायक कृषि अधिकारी**

**सजा** : ______________________

**ता.** :______________________

**जि.** :______________________

(टिप : सदरचे परिशिष्ट प्रकल्पाच्या DBT ॲपवर उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे सदरील परिशिष्ट अपलोड करण्यात येवू नये.)

# परिशिष्ट - ४
## शेतक-याचा काम पूर्णत्वाचा अहवाल
## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — विहीर पुनर्भरण

मी श्री / श्रीमती ------------------------------------------------- गांव ----------------------- तालुका ---------------------- जिल्हा.---------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, तालुका कृषि अधिकारी यांच्या पूर्व संमतीपत्र क्र ............................ दिनांक / /२० अन्वये मला मंजूर केलेले विहीर पुनर्भरण हे काम मी मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकषानुसार दिनांक ..................... अखेर १०० टक्के पूर्ण केलेले आहे.

कृपया, पूर्ण झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन त्याची नियमानुसार मापनपुस्तीकेत नोंद घेण्यात यावी. सदर अनुदान माझ्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात यावे, ही विनंती.

दिनांक : .......................
ठिकाण : ......................

अर्जदाराची सही / अंगठा
श्री/श्रीमती -------------------------------------------

**<u>परिशिष्ट - ५</u>**

**मोका तपासणी अहवाल**

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — विहीर पुनर्भरण**

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १) | तपासणी दिनांक : | |
| २) | लाभार्थ्याचे नाव : | |
| ३) | गावाचे नाव : | |
| ४) | तालुका : | |
| ५) | जिल्हा : | |
| ६) | पूर्वसंमती क्र. दिनांक : | |
| ७) | मंजूर असलेल्या प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट न. | |
| ८) | लाभार्थ्याने मार्गदर्शक सुचनेप्रमाणे विहीर पुनर्भरणाचे काम पूर्ण केले आहे का? | होय / नाही |
| ९) | विहीर पुनर्भरण या घटकासाठी पूर्वसमंती नुसार मंजूर रक्कम | |
| १०) | विहीर पुनर्भरणासाठी मापनपुस्तिकेनुसार येणारी रक्कम | |
| ११) | विहीर पुनर्भरणाची शिफारसीत करावयाची अनुदानाची रक्कम | |
| १२) | तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |

लाभार्थ्याने केलेल्या कामाची त्यांच्या क्षेत्रावर जाऊन मी मोका तपासणी केली आहे. मंजूर विहीर पुनर्भरणाचे काम हे मार्गदर्शक सूचनेनुसार व तांत्रिक निकषानुसार करण्यात आलेले आहे. प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार या लाभार्थ्यास अनुज्ञेय असलेल्या अनुदानाची मी परिगणना केली असून सदर अनुदानाचे वितरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी व अंगठा)**

**सहाय्यक कृषि अधिकारी**

दिनांक सहित

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

## परिशिष्ट - ६

## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती ------------------------------------------ | |
| ३. | पदनाम | | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/कर्मचारी | १. श्री/श्रीमती ----------------------------------------<br>पदनाम ---------------------------------------------<br>२. श्री/श्रीमती ----------------------------------------<br>पदनाम --------------------------------------------- | |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. ---------------<br>वर्गवारी: --------------- (अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर)<br>मु.पो. ----------------------<br>ता. ------------------ उपविभाग -------------------<br>जि. ------------------------------ | |
| ६. | बाब | विहीर पुनर्भरण | |
| ७. | अंदाजपत्रकीय रक्कम रु, | | |
| ८. | पूर्ण झालेल्या कामाची रक्कम रु. | | |
| ९. | लाभार्थ्याने मार्गदर्शक सुचनेप्रमाणे विहीर पुनर्भरणाचे काम पूर्ण केले आहे का? | होय / नाही | |
| १०. | लाभार्थ्यास देय अर्थसहाय्याची रक्कम रु. | | |
| ११. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १२. | नसल्यास तफावत रक्कम रु. | | |
| १३. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १४. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | | |
| | | | |
| १५. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | | |
| | | | |

**(स्वाक्षरी)**
**तपासणी अधिकारी, श्री.......................................................**
**पदनाम. ...........................................................................**

**(स्वाक्षरी)**
**इतर अधिकारी श्री. ............................................................**
**पदनाम. . .........................................................................**

**(स्वाक्षरी)**
**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**(नाव.................................................)**